| MHKO110009682023 | नियमित दिवाणी दावा क्र. १५८/२०२३ मधील निशाणी क्रमांक ३२ खालील आदेश<br>हसन अल्ली पन्हाळकर<br>विरुध्द<br>हुसेन अल्ली पन्हाळकर वगैरे |
|---|---|

वादी ने प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल करून सदर अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध केला आहे.

२. वादी चे असे कथन आहे की, सदरचा दावा वादी यांनी हक्कज्ञापन व कायम मनाई करिता प्रतिवादी विरूध्द दाखल केलेला आहे. सदर दाव्याच्या कामी वादी महत्वाचे कागदपत्र हजर करत आहे. सदर कागदपत्र न्यायाच्या कारणास्तव दाखल करून करून घेणे महत्वाचे असलेने न्यायास मदतच होणार आहे. सबब, वादीने सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादीचे यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शविला आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादीने सदर दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाई करिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये अद्यापी मुद्दे काढलेले नसून प्रकरण पुराव्याकरिता प्रलंबित आहे. वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार केला असता ती कागदपत्रे नि. ५ च्या आदेशाकरिता उपयोगी पडतील. त्यामुळे, सदर कागदपत्रे दाखल करुन घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून सदर अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **आ दे श**

१. नि. ३२ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी कागदपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

sd/-

**दिनांकः- २२/०४/२०२६.**
**पेठवडगाव**

**( आर. एस. मोरे )**
**३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पेठवडगाव**